# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

**CB/52/2025**

# प्रेसनोट

| गुन्हे शाखा, नवी मुंबई | दिनांक १८/०९/२०२५ |
| --- | --- |

**नवी मुंबई पोलीसांकडून अंमली पदार्थाची तस्करी करणाऱ्या टोळीवर प्रथमच महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम ( MCOCA) अंतर्गत कारवाई**

---------------------------------------------------------------------------------

महाराष्ट्र शासनाने, अंमली पदार्थाची तस्करी करणाऱ्या टोळयांवर कडक कारवाई करण्याच्या उददेशाने महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ (MCOCA) कायद्यात दुरुस्ती करुन अंमली पदार्थ तयार करणे, बाळगणे, वाहतूक करणे, विक्री करणे इत्यादी अवैध कृत्ये '**संघटित गुन्हे**' घोषित केलेबाबतचा निर्णय दिनांक ०८/०७/२०२५ रोजी पारीत केला आहे. यापुढे अशा गुन्हेगारी टोळयांवर 'MCOCA' अंतर्गत कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

त्या अनुषंगाने पोलीस आयुक्त, श्री. मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त, श्री. संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, श्री. सचिन गुंजाळ यांनी नवी मुंबई परिसरात अंमली पदार्थाची अवैध व्यवसाय करणाऱ्या टोळयांविरुध्द **'MCOCA'** अन्वये कारवाई करून **नशामुक्त नवी मुंबई अभियान** अधिक प्रभावीपणे राबविण्याचे आदेश दिले होते.

दिनांक ११/०७/२०२५ रोजी अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे वपोनि, संदीप निगडे यांना मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने ओमकार अपार्टमेंट, ईश्वरनगर, दिघा, नवी मुंबई येथे छापा कारवाई करून आरोपीत नामे १) उषा रोशन नाईक, २) शैलश बसन्ना नाईक उर्फ पिल्लु, ३) ज्योती निलेश नाईक, ४) निलेश बसन्ना नाईक, ५) रोशन बसन्ना नाईक व ६) शांताबाई किसन करंडेकर, सर्व रा.दिघा, नवी मुंबई यांचे ताब्यातून एकुण २५२.३ ग्रॅम वजनाचा व्यावसायिक मात्रेतील ७५,६९,०००/- रुपये किंमतीचा मेफेड्रॉन हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला असून त्यांचेविरुध्द रबाळे एम.आय.डी.सी पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर २७७/२०२५ एन.डी.पी.एस.कायदा १९८५ चे कलम ८(क), २२(क), २९, सह भारतीय न्याय संहिता सन २०२३ चे कलम १११ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयामध्ये सचिन कणसे @ काका राहणार ठाणे हा पाहिजे आरोपी असुन त्याचा शोध सुरू आहे.

सदर गुन्हयाचा तपास सुरू असताना टोळी प्रमुख अटक आरोपी शांताबाई किसन करंडेकर हिने इतर आरोपींसह टोळीच्या आर्थिक फायद्यासाठी मागील अनेक वर्षापासून अंमली पदार्थ विक्रीचे गंभीर गुन्हे केले असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. तसेच नवी मुंबईतील रबाळे व आजुबाजूच्या परिसरात टोळीचे वर्चस्व व दहशत निर्माण करण्याचे उददेशाने खुन, खुनाचा प्रयत्न, मारामारी असे शरीराविरूध्दचे गंभीर गुन्हे केलेले आहेत. त्यांच्या दहशतीमुळे सर्व सामान्य जनतेच्या मनात त्यांचेविषयी भिती व दहशत निर्माण झाली होती.

'MCOCA' कायद्यातील नविन दुरूस्तीच्या अनुषंगाने गुन्हयातील आरोपीत यांनी सदरचा गुन्हा हा संघटीतपणे केला असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने, त्यांचे गुन्हेगारी प्रवृत्तीस व अंमलीपदार्थाचे तस्करीस नियंत्रण घालण्याचे उद्देशाने त्यांचेवर महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा (MCOCA) सन १९९९ अंतर्गत कारवाई करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस आयुक्त, रबाळे विभाग, नवी मुंबई श्री राहुल धस हे करीत आहेत.

अंमली पदार्थाची तस्करी करणाऱ्या गुन्हेगाराची माहिती पोलीसांना हेल्पलाईन क्रंमाक ८८२८११२११२ यावर द्यावी (माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल) असे नवी मुंबई पोलीसांकडून जनतेला आवाहन करण्यात येत आहे.

★★★★★★★★★★